वाचा - १) या कार्यालयाचे दि.२०/१०/२००५ रोजीचे परिपत्रक
२) या कार्यालयाचे दि.२१/१०/२०११ रोजीचे परिपत्रक
२) या कार्यालयाचे दि.३०/०५/२०११ रोजीचे परिपत्रक

---

क्र.का.५/मुद्रांक-११/प्र.क्र.२०/११/१६२४
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - ०५/१२/२०११.

**विषय :- मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१ बाबत**

**परिपत्रक**

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१ खालील प्रकरणे ही शासन महसूलाशी संबंधित असून, विशेषतः कलम ३१ खालील होणाऱ्या अभिनिर्णय प्रकरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता यापूर्वी या कार्यालयाने दि.२०/१०/२००५ रोजी सविस्तर परिपत्रक काढून योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. तथापि या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आल्यानुसार पुनश्च दि.२१/१०/२०११ रोजी देखील परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. तरी सुध्दा सदर परिपत्रकाप्रमाणे अंमलबाजवणी होत नसल्याचे दिसून येते.

तरी मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१ खालील प्रकरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी खालीलप्रमाणे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.

प्रकरण दाखल करण्यापूर्वी ते योग्य त्या कारणासाठीच दाखल करण्यात येत आहे, त्याची खात्री करावी, व ते कारण अर्जात स्पष्ट नमूद करुन प्रकरण स्विकारावे.

१) प्रकरण दाखल होणेपूर्वी पक्षकारास दि.२०/१०/२००५ चे परिपत्रकात नमूद केलेल्या सूची (चेकलिस्ट) प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगावे.
२) चेकलिस्ट प्रमाणे एखाद्या कागदपत्रांची पूर्तता होत नसेल तर सदरचे प्रकरण तात्काळ पक्षकारास परत करुन, त्रुटींची पुर्तता करणेबाबत लेखी सूचना द्याव्यात.
a) सदर कलमांर्गत स्विकारलेल्या प्रकरणांची स्वतंत्र नोंदवही ठेवून, त्यात प्रकरणनिहाय नोंद घ्यावी.
a) प्रकरणांचा निपटारा प्रथम आवक प्रथम जावक (First in First Out) याच पध्दतीने करण्यात यावा.
५) दाखल केलेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत प्रकरणाचा निपटारा होणे आवश्यक आहे.

६) ज्या प्रकरणांत शासनाकडून मुद्रांक शुल्क माफी घोषित केलेली आहेत, अशी प्रकरणे विहीत मुदतीत म्हणजेच माफीची मुदत स्पष्ट नमूद असेल, त्या तारखेच्या आधी सदर प्रकरण बंद होणे आवश्यक आहे.

७) प्रत्येक अभिनिर्णय प्रकरणात सविस्तर स्पष्टीकरणात्मक अंतिम आदेश पारित करणे आवश्यक आहे.

८) जर सदर प्रकरणात मुद्रांक शुल्क वसूल करावयाचे असल्यास, आपल्या कार्यालयाकडून मुद्रांक शुल्क वसूल करुनच अंतिम आदेश पारित करावा. अंतिम आदेशाच्या अनुषंगाने फ्रँकिंग/ ई-स्टॅम्पींगद्वारे मुद्रांक शुल्क भरुन, दुय्यम निबंधक कार्यालयात परस्पर दस्त नोंदणीस प्रवृत्त करुन नये. अंतिम आदेशाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेल्या प्रकरणाचीच नोंदणी करावी व दस्त दुय्यम निबंधक यांनी दि.३०/०५/२०११ रोजीचे परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

९) तपासणी पथकाने / तपासणी अधिकारी हे ज्या वेळी तपासणी करतील त्यावेळी सदरच्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही केली जाते किंवा नाही, याची खातरजमा करावी व त्याची नोंद त्यांचे तपासणी अहवालात घेणे आवश्यक आहे.

१०) मुंबई, ठाणे व पुणे शहर येथील सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होणाऱ्या अभिनिर्णय प्रकरणात मुद्रांक शुल्क **ग्रासद्वारेच** जमा होणे आवश्यक आहे. तसेच ही सुविधा यथावकाश सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास लागू करण्यात येईल व त्याचे आदेश स्वतंत्र पारित करण्यात येतील.

**सही/-XXX**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत-

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
३) सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

**निर्गमित,**

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.**